NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २९.१०.२०२६ गुरूवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २८.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण १,४०,९६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये १४ ईसमांवर कारवाई करून एकुण ६९,०२३/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ५५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०६ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २५४ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ६७ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ५२ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ३३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १५३ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ३० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०६३ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये २३ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २० केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९९५ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,२७,४५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) मा. पोलीस आयुक्तांचे एस्कॉर्ट पथकाची कामगिरी :– प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल. एकुण ९ लाख ३७ हजार ९५१ रूपयांचा मुद्देमाल जप्त.

दिनांक २९.१०.२०२६ चे ०१.३५ वा. चे सुमारास, मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती की, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत प्लॉट नं. ८९९, मेहबुबपुरा, नुरी मस्जीदजवळ, टिपू सुलतान चौक येथे अवैधरित्या प्रतीबंधीत तंबाखु व गुटखा विक्रीकरीता साठवुन ठेवलेला आहे. अशा प्राप्त सुचनेवरून, नमुद ठिकाणी जावुन, पंचासमक्ष रेड कारवाई केली. तेथे हजर असलेल्या ईसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव फईम अन्सारी वल्द नबी अहमद अन्सारी, वय ४० वर्षे असे सांगीतले. त्याचे घराची पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे पहील्या माळ्याचे टेरेसवरील टिनपत्राचे शेडचे रूममध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ गुटखा,

सुगंधीत पानमसाला मिळुन आला. तसेच, त्याचे सोबत राहणारा भाऊ नामे नदीम उर्फ लखन नबी अहमद अन्यारी, वय ३८ वर्षे याने भाड्याने घेतलेल्या घराशेजारील एका रूमची पाहणी केली असता, तेथे सुध्दा शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ गुटखा, सुगंधीत तंबाखु व पानमसाला मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ गुटखा, सुगंधीत तंबाखु व पानमसाला असा एकुण किंमती ९,३७,९५१/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद मुद्देमाल त्याचा भाऊ नदीम उर्फ लखन याचा असुन, त्याचे सोबत मिळुन ते शहरातील वेगवेगळ्या पानठेला चालकांना लपुन—छपुन विक्री करीत असल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्री करीता साठवणुक करून बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींविरूध्द सरतर्फे पोउपनि. सदाशिव कणसे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) भा.न्या.सं. सहकलम ५९, ३(१)(zz)(iv), ३०(२)(a) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात एस्कॉर्ट पथकाचे पोउपनि. अभिषेक बागडे, पोहवा. प्रविण गजभिये, पोअं. साहील भोयर, अक्षय घुगे, अमोल टेंभरे, अविनाश दरणे व मपोअं. रसिका नांदणे यांनी केली.



<u>२) वाठोडा पोलीसांची कामगिरी :— अवैध नायलॉन मांजाविक्रीचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक.</u>

दिनांक २७.१०.२०२६ चे ००.०१ ते ०२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, सिम्बॉयसीस कॉलेज रोड, जनता गॅरेज समोर, बिडगाव येथे ऑटोरिक्षा क्र. एम.एच ४९ सि.एफ २२७४ ला थांबवुन, चालकास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव साजिद अहमद शकील अहमद, वय २८ वर्षे, रा. अन्सार नगर, चॉद हॉटेल जवळ, डोबीनगर, तहसिल, नागपुर असे सांगीतले. त्याचे ऑटोमधील बोरींची पाहणी केली असता, त्याचे ताब्यात शासनाने प्रतिबंधीत केलेला मोनाकाईट व मोनोकाईट गोल्ड कंपनीचे नायलॉन मांजाचे एकुण ३६० नग चक्री मिळुन आल्याने, त्याचे ताब्यातुन चक्री, मोबाईल फोन व ऑटोरिक्षा असा एकुण १३,९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. ताब्यातील इसमांस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद मुद्देमाल त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे बद्रे आलम रा. पिवळी नदी, यशोधरानगर, नागपुर तसेच एक मोबाईल क्र. चा धारक यांचेकडुन माजरी येथुन आणुन सिम्बॉयसिस कॉलेजजवळ

वाठोडा येथे आणल्याचे सांगितले होते. यावरुन तिन्ही आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू होता.

नमुद गुन्हयाचे अधिक तपासात, वाठोडा पोलीसांनी तांत्रिक तपास व गुप्त माहितीवरुन पाहिजे आरोपी नामे बद्रे आलम मुख्तार अहमद वय ३६ वर्ष रा. मोमीनपुरा, नागपूर यास सापळा रचुन दिनांक २८.१०.२०६ रोजी ताब्यात घेतले. त्याचे पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील गोडावुनची झडती घेतली असता, तेथुन शासनाने प्रतिबंधीत केलेला मोनाकाईट व मोनोकाईट गोल्ड कंपनीचे नायलॉन मांजाचे एकुण १८० नग चक्की मिळुन आल्याने, त्याचे ताब्यातुन नायलॉन मांजा चक्की किंमती ५,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रमोद पोरे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— हद्दपार ईसमास अटक.

दिनांक २८.१०.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना राजीव नगर, सरोदे मोहल्ला, बिरसा मुंडा मंदीरजवळ एक लालसर रंगाचे टिशर्ट व हॉफपॅन्ट घातलेला इसम संशयीतरित्या दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव सागर उर्फ अंकुश उर्फ मोठी नस्सु विजयसिंग चव्हाण वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र. ४, राजीव नगर, शिवमंदीरजवळ, हिंगणा रोड, नागपुर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२५ दिनांक २४.०४.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. विजय माने यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे अंबाझरी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, प्लॉट नं. १९१, कुमार बेकरी समोर, गोकुलपेठ, अंबाझरी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी गुलशन धरमदास वटानी वय ४४ वर्षे यांचे पत्नीने त्यांचे सोन्याचे वेगवेगळे दागिने किंमती १०,२५,०००/— रु. चा मुद्येमाल दिनांक ३१.०८.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, आपले राहते घरातील बेडरुममधील लाकडी कपाटात ठेवलेलो होता. त्यांनी नमुद मुद्येमाल दिनांक २३.१०.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास ठेवलेल्या ठिकाणी बघितला असता, मुद्येमाल मिळुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे बेडरुममध्ये प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी कपाटातील नमुद मुद्देमाल चोरून नेला.

अशा फिर्यादी यांनी दिनांक २८.१०.२०२६ चे ११.३० वा. दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि प्रशांत गायकवाड ९६७३३८४६६० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे इमामवाडा :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २८.१०.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा पोलीसांचे पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत सिरसपेठ, घर क्र. १३८, स्वीपर कॉलनी, गायधनेच्या चक्कीजवळ, शेखर जुगेल यांचे घरी काही इसम ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून हार—जीतचा जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) रितेश शेखर जुगेल वय ३९ वर्षे रा. प्लॉट क्र. ३८, गायधने आटा चक्कीजवळ, सिरसपेठ, नागपूर २) अनुप तोता आंबेकर वय ५८ वर्षे, रा. गायधने आटा चक्कीजवळ, सिरसपेठ, नागपूर ३) अरमान विजय मोगरे वय २८ गायधने आटा चक्कीजवळ, सिरसपेठ, नागपूर ४) दुर्गाप्रसाद हिरालाल बक्सरे वय ५५ वर्षे रा. माता मंदीरजवळ, सिरसपेठ, नागपूर ५) सुनिल राजु जुगेल वय ४८ वर्षे, गायधने आटा चक्कीजवळ, सिरसपेठ, नागपूर ६) योगेश पवन शुक्लावार वय ४२ वर्षे, स्वीपर कॉलनी, गायधने आटा चक्कीजवळ, सिरसपेठ, नागपूर ७) बबलु भोजरा मनपिया वय ५२ वर्ष रा. सिरसपेठ, समाजभवन जवळ, इमामवाडा हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील रोख ४,१००/— रु., ५२ ताश पत्ते, ०१ मोबाईल, पांढरी ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ झेड ७४४५ असा एकुण ६४,१००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोउपनि अजय कुंवर यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि धनराज काकडे यांनी आरोपींविरूध्द कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे अंबाझरी :— पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, दिनांक २८.१०.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास धरमपेठ, पहनावा बुटीकचे मागे एक अनोळखी ईसम वय अंदाजे ७० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना समाजसेवक वैभव बागडे वय २७ वर्ष रा. आस्था भिक्षेकरी निवासकेंद्र, घाट रोड, नागपुर यांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान १९.२६ डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अंबाझरी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. रणजीत माजगावकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.